# समाजसेवेचा किडा

“आई...!” सचिन घरातुन ओरडला.
“काय ओरडतोस रे बाळा?” म्हणत स्वयंपाकघरात पोळ्या लाटणारी आई घाईतच सचिनपाशी आली.
“अगं आई, माझे लहानपणाचे कपडे शोधुन देना. मी आणि गणेश त्या झोपडपट्टीतल्या लहान मुलांना ते वापरायला देणार आहोत. लवकर दे! गणु येतच असणार,” सचिन हातवारे करीत सांगु लागला.
आईने क्षणभर विचार केला.
“त्या कपाटाच्या खालच्या कप्प्यात आहे पाहा,” हातातील लाटण्याने ईशारा करीत आई म्हणाली व पुन्हा स्वयंपाकघराकडे जाऊ लागली.
“ए आई, तुच काढुन देना!” सचिन कळवळीने म्हणाला पण तोपर्यंत आई स्वयंपाकघरात पोहोचली होती.
“तुच काढ सचु! माझे हात पिठाचे आहेत आणि जेवण करुनच जा...,” स्वयंपाकघरातुन आवाज आला.
“हो.....आ.....ई!” सचिन विशिष्ट चाल लावीत उत्तरला व उठून कपाटात कपडे शोधु लागला.

चौदा वर्षांचा सचिन हा नववीतला साधारण मुलगा पण जेव्हापासुन त्याने मदर टेरेसाचे आत्मचरीत्र वाचले होते तेव्हापासुन त्याला समाजसेवा करण्याचे असाधारण वेड लागले होते. आपणही असेच समाजाची सेवा करायची, गरजुंना मदत करायची असे त्याने मनोमन ठरविले होते, यात त्याला त्याचा लंगोटी मित्र गणेश उर्फ गणुची आधीपासुनच साथ होती. हळुहळू करुन स्वत:चा एक ग्रुप बनविला होता जो खास अश्या कामांमध्ये पुढाकार घेण्यास तत्पर होता. सचिनचा शब्दांत ही तर त्यांची फक्त सुरूवात होती. त्याचा डोक्यात आणखी खुप सारे प्लॅन्स होते.

****

जेव्हापासुन सचिनचा डोक्यात समाजसेवेचा किडा घुसला होता तेव्हापासुन तो जो रस्त्यात दिसेल त्याला आपल्यापरीने मदत करु लागला. त्याचा कल गरजु लोकांकडे जास्त होता. मात्र हळुहळू त्याचा ह्या गोष्टींचा त्रास घरातल्या मंडळींना होऊ लागला. त्याच्या मोठ्या ताईला रक्षाबंधनचे गिफ्ट न देता, त्याने ते पैसे वापरुन वर्गातील एका गरजु मुलाला त्याचा वाढदिवसाला पेन व वही गिफ्ट दिली. ट्युशनचे शिक्षक परीक्षेचा दृष्टीने जे महत्त्वाचे प्रश्न विद्यार्थ्यांना देत असत ते तो त्या गरीब वर्गमित्रांना जाऊन देत असे ज्यांना ट्युशन लावणे शक्य नव्हते. आपली पॉकिटमनी तो ह्याला त्याला मदत करण्यातच खर्च करीत असे. आपल्या मित्रांचा मदतीने त्याने अनेक असे उपक्रम राबविण्यास सुरूवात केली होती, त्यामुळे

त्याचा अभ्यासात त्याचे दुर्लक्ष होत होते. त्याचा बाबांना हे मुळीच आवडत नव्हते पण ते काही बोलतही नव्हते.
सचिन रोज सकाळी सायकलवरुन शाळेला जात असे. शाळेला येणा-जाण्याचा मार्गावर नेहमीच दाट वाहतुक राहत असे. शाळेला जाताना अंध फारुखचाचांना रस्ता पार करुन दिल्याशिवाय तो कधीही पुढे जात नसे. एके दिवशी फारुखचाचांना रस्ता पार करुन दिल्यानंतर शाळेत जात असताना त्याला रस्त्याचा कडेला लोकांची तोबा गर्दी दिसली. गोंधळलेल्या सचिनने सायकल कडेला उभी केली व तो त्या गर्दीत शिरला.
त्या ठिकाणी एक गंभीर एक्सिडेंट झालेला होता. एक वयस्क जोडपं आपल्या स्कुटीवरुन वळण घेत असताना समोरुन भरधाव येणार्या एका कारने त्यांना जोरदार धडक दिली होती. ज्यामुळे त्यांची स्कुटी बेजार होऊन कडेला पडलेली होती व स्कुटी चालवणारे ते आजोबा कडेलाच बसुन त्या अनपेक्षित धक्क्यामुळे ढसाढसा रडत होते. त्यांनी आपला एक हातातील रुमाल कपाळाला लावला होता जेथुन रक्तस्राव चालु होता. त्यांचासमोरच त्यांची पत्नी बेशुद्ध होऊन पडली होती. सचिनने पहिल्यांदा असे काही दृश्य पाहिले होते म्हणुन प्रथमत: त्याचे पाय थरथरले पण नंतर त्याने स्वत:ला सांभाळले. ज्या कारने त्यांना धडक दिली होती तिचा पुढचा भाग बर्यापैकी डेमेज झाला होता आणि तिचा मालक त्या क्षणाला सांभाळायचे सोडुन उलट त्या आजोबावरच ओरडत होता.
“काय ते म्हातारड्या, गाडी येत नाही मग कशाला चालवतो रे?”
“अहो, ते सोडा! ह्या आजींना लवकर रुग्णालयात न्या जास्त काही व्हायचा आधी,” गर्दीतुन एक व्यक्ती म्हणाला.
त्या आजी बिलकुल पण हालचाल करीत नव्हत्या काही वेळाने त्यांचा डोक्याचा मागचा बाजुने रक्ताचा पाट वाहु लागला होता. तो कारमालक स्वत:ची कार रुग्ण्यालयात न्यायला नाकारत होता. ते आजोबा हतबल होऊन रडतच होते. गर्दीतले लोकं एकमेकांना पाहुन फक्त एकच वाक्य उच्चारत होते.
“त्या आजींना उचला रे! कोणीतरी रुग्णालयात घेऊन जा!”
“उचला ना!”
“उचला ना!”
पण कोणीही पुढाकार घेऊन त्या आजींना हात लावण्यास तयार नव्हते. मोठ्या लोकांचा गर्दीत आपली काही गरज नाही असे वाटणार्या सचिनला त्यांचा नाकर्तेपणावर राग येत होता. शेवटी त्याला मात्र राहावले नाही व तो स्वत: त्या आजींकडे जाऊन त्यांना उठवु लागला. सर्व लोकं तमाशा पाहात उभे होते. सचिनचा शाळेचा युनिफॉर्मवर रक्ताचे काही डाग पडले. बुटांवरही रक्ताचे टिपके पडले. त्याची परवा न करता त्याने त्या आजींना उठवुन बसवले व आजोबांनाही धीर दिला. आपला हातरुमालाने आजीची जखम झाकली आणि आजोबांना ते दाबुन ठेवण्यास सांगितले. तमाशा पाहणारे लोकं आता आपपसांत बरडु लागले होते.
“हॉस्पिटलमध्ये कसे नेणार...?”

“आता हॉस्पिटलमध्ये कसे नेणार...?”
“अहो तेच ना!”
कारण आसपास कोणतेही वाहन नव्हते. येणारे जाणारे वाहने ते दृश्य पाहुन झाल्यावर सरळ निघुन जात होते. सचिनला समजले होते की, त्या कारचा खऊट मालक काही त्यांना हॉस्पिटलमध्ये नेणार नाहीये तेव्हा त्याने त्याला विनंती करण्याचेही कष्ट घेतले नाही. तेथुन काही अंतरावर रिक्षा स्टँड होते. सचिनने आपली सायकल काढली व तो तेथवर अगदी वेगात जाऊन पोहोचला.
“भाऊ, माझ्यासोबत चल ना! तिथे एक एक्सिडेंट झालाय, आणि एका आजींना खुप लागलयं त्यांना हॉस्पिटलमध्ये न्यायचयं,” दमलेला सचिन विनंती करु लागला. तो रिक्षावाला तरीही आरामात बसुनच होता.
“कुठे झाला एक्सिडेंट?” काडीने आपले दात कोरीत रिक्षावाल्याने विचारले.
“इथेच, काही अंतरावर,” सचिन इशारा करु लागला.
“तुझ्या कोणी लागता का त्या आजी?”
“नाही...नाही”
“मग, रिक्षाभाडे कोण देणार?”
“त्यांचासोबतचे एक आजोबा आहे तिथे ते देतील, नाहीतर मी देईन!”
“ठीक आहे!” म्हणत त्याने रिक्षा चालु केली.
सचिन सायकलवर पुढे जात होता. एक्सिडेंटच्या ठिकाणी ते पोहोचेपर्यंत गर्दी वाढली होती. काही पुढारी मंडळी तेथे एकमेकांना शहाणपणाचे डोस पाजत होती. लोकांना हटकुन बाजुला करीत होती. सचिनला येताना पाहुन एकाने तर त्याला लांबुनच हटकले म्हणुन त्याने सायकल जरा लांबच थांबवली. येणार्या रिक्षेला पाहुन सर्व पुढारी मंडळी तिच्या समोर आले जणु तो रिक्षावाला तेथुन पळुन जाणार होता. त्यांना काय माहीत की, एका जागरुक मुलाने वेळीच ती रिक्षा बोलावुन आजीचे प्राण वाचविण्यास मोलाची भुमिका निभावली होती. त्या गर्दीतुन मार्ग काढीत त्या पुढार्यांनी त्या आजी व आजोबांना रिक्षात कोंबले. त्यांना हॉस्पिटलचा दिशेने जाताना सचिन पाहात राहीला. तिथे पुढार्यांची लोकांसमोर श्रेय लाटण्याची स्पर्धा चालु होती, त्यामुळे सचिनला थोडेसे वाईट वाटले. त्या दिवशी तो शाळेत न जाता विषण्ण मनाने तसाच घरी आला.
आई व ताईला सर्वकाही सांगुन दाखविले की कसे एवढ्या तीस-चाळीस लोकांमधुन एकही जण त्या आजींना उठविण्यासाठी पुढे आला नाही. शेवटी मला स्वत:लाच पुढाकार घ्यावा लागला, रिक्षा बोलवावी लागली, शाळा बुडवावी लागली. कोणीही स्वत:वर रक्ताचे डाग लाऊन घेण्यास धजावत नव्हता.
“हा असा कसा समाज आहे आई आपला? कुणाचा जीवाची कशी कुणालाही परवा नाही?” त्याने आईला विचारले. आईने स्मित केले.
“अरे माझा बाळा, तु तुझ्या परीने मदत केलीस ना! मग बस, विसर बघु ते आता!”

सचिनने होकारात मान डोलावली.

****

संध्याकाळी बाबा आल्यावर ताईने सर्व कहाणी त्यांना सांगितली. त्यांना आपल्या मुलाचा डोक्यात शिरलेल्या ह्या समाजसेवेच्या किड्याची आता चिड यायला लागली होती.

“तुला काय गरज होती पुढे पुढे करायची? होते ना लोकं तिथे, केली असती ना कोणीतरी मदत. तुलाच काय हौस होती स्वत:चा युनिफॉर्म खराब करुन घ्यायची? आणि शाळा बुडवायची?” बाबा ओरडले.

“पण बाबा, कोणीही पुढे येत नव्हतं मदत करायला. वाट पाहत राहीलो असतो तर त्या आजींचा जीव गेला असता तिथेच,” सचिन उत्तरला. बाबा काही न बोलता रुममधुन निघुन गेले.

सचिन आता कळत नव्हते की, आपण बरोबर केले की चुक????

बाबा गेल्यावर त्याची प्रेमळ आई त्याचाजवळ आली.

“बाळा, तु अगदी बरोबर वागलास पण हे जे काही तु करतोयेस, काळजी घे की यात काही स्वार्थ भावना यायला नको. अगदी निस्वार्थपणे कार्य करीत राहा,” आईने प्रेमाने समजावत म्हणाली.

सचिनने जरी आईचे म्हणणे मान्य केले असले तरी तो आतुन जरासा अशांतच होता.

5 दिवसांनंतर....

सचिन सायकलने बाजारात जात होता. आईने त्याला काही सामान आणावयास पाठविले होते. चौकात पोहोचल्यावर त्याचा मित्र गणेशचा फोन त्यास आला. त्याने सायकल एका किराण्याचा दुकानासमोर उभी केली व कॉल रिसीव करुन गणेशसोबत बोलु लागला.

“काय रे कुठे आहेस?”

“काहीनाही रे, इकडे बाजार चौकात आलोय, काय झाले?”

“अरे उद्या आपल्या निल्याचा वाढदिवस आहे, काय प्लॅनिंग करायचे?”

“अरे हो, लक्षातच नाही राहीले. बरं आठवण दिलीस, आपण.....,,,,,” सचिन बोलतच होता की मागुन ताबा सुटलेली एक कार वेगाने येऊन त्याला धडकली....

पुढच्याच क्षणाला सचिन जमिनीवर पडलेला होता. त्याचा डोक्याला जबर मार बसल्याने त्याला त्याचे डोके खुप जड वाटत होते. तो अर्धबेशुद्धावस्थेत होता. त्याला दिसत होते, ऐकु येत होते पण तो हालचाल करु शकत नव्हता. धडकेत त्याचा फोन हातातुन सुटून दुर पडला होता. कॉल अजुनही चालु होता. सचिनचे उत्तर न देणे व लोकांचा गोंगाटामुळे गणेशला काहीतरी गडबड असल्याचे उमजले.

सचिनला लोकांचे बोलणे ऐकु येत होते व काहीसे अंधुक अंधुक दिसतही होते. जवळपास 30-40 लोकं त्याचा अवतीभोवती घेरा करुन त्यास पाहत होते. सर्वजण आपापसांत कुजबुजत होते.

पुन्हा तेच वाक्यं, पुन्हा तोच विचलितपणा...
“अरे अरे कोणीतरी उचला रे! हॉस्पिटलमध्ये न्या!”
“उचला ना!”
“उचला ना कोणीतरी!”
काहीजण तर नुसते पाहुन आपापली भाजी घेण्यास निघुन जात होते, अनेकजण मोबाईलवर व्हिडीओ शुट करण्यात व्यस्त होते तर कोणी मुर्खासारखे अर्धशुद्ध सचिनला त्याचा घराचा फोन नंबर विचारत होते. सचिनला आता आपण शेवटचा श्वास घेऊ असे वाटत होते कारण त्याला त्याची चेतना हळुहळू लोप पावताना जाणवत होती. सेकंद दर सेकंद त्याचे हृद्याचे ठोके मंद होऊ लागले. त्याला श्वास घेण्यास अडचण भासु लागली आणि....
त्याचे डोळे सावकाश बंद झाले....
****

काही वेळाने सचिनची चेतना पुन्हा जागली. त्याने आपले डोळे हळुहळू उघडले. आता त्याला अतिशय फ्रेश वाटत होते जसे तो खुप गाढ झोपेतुन उठला होता. समोर गणेश आपल्या मोबाईलमधे पाहात बसला होता. सचिनकडे पाहताच त्याचा चेहर्यावर हास्य उमटले.
“ऊठलास सच्या! मरतामरता वाचलास ना भाऊ!”
सचिनला गणेशनेच हॉस्पिटलमधे आणले होते. उपस्थित 30-40 लोकांपैकी कोणीही त्यास हॉस्पिटलमधे नेण्याची तसदी घेतली नव्हती.
आईबाबा आणि ताई आत आले. आईच्या डोळ्यांत अश्रु तरळत होते. बाबाही दुखी होते.
“कसा आहेस माझा बाळा?” बोलताना आईचा गळा दाटुन आला.
“मी ठीकेय आई,” सचिन बाबांकडे पाहत म्हणाला, “बाबा, आज मलाही मदत करायला कोणीही पुढे आले नाही. जर गणेशला समजले नसते तर कदाचित कोणीही मला हॉस्पिटलमधे आणल नसते,” हे ऐकुन बाबांचाही डोळ्यांत अश्रु तरळुन आले.
“हो बेटा, तु बरोबर होतास,” बाबा डोळे पुसत म्हणाले.
“माझेही वाचणे कठीण झाले असते,” यावर आईने हात उगारुन त्यास प्रेमाने चापटी मारली व शांत बसण्यास खुणावले.
****
त्या दिवसापासुन सचिन हिरमुसल्यागत राहायला लागला. त्याची पॉकीटमनी आता जशीची तशीच पडुन राहात असे. आपले सर्व समाजसेवेचे उद्योग त्याने बंद केले होते. खास कॅंसरग्रस्त रुग्णांचा करमणुकीसाठी हॉस्पिटलमध्ये ठेवलेल्या एका छोट्या कॉमेडी एक्टची तयारी त्याने थांबविली होती. शिवाय अंध असलेल्या फारुखचाचांना त्याने रस्ता ओलांडुन देणे, झोपडपट्टीतल्या मुलांसाठीचे मित्रांचा साथीने चालवलेले उपक्रम, ट्युशनमधील महत्त्वाचे प्रश्न गरीब वर्गमित्रांना देणे, एवढेच नाहीतर दारात येणार्या वृद्ध भिकार्याला त्याने जेवण वा नाणे देणेही बंद केले होते. यामुळे सगळ्यांशीच त्याचा दुरावा वाढला होता. आपला परिवार व गणेश

सोडुन त्याने सर्वांनाच दुय्यम मानले होते. गणेशने त्यास समजविण्याचा खुप प्रयत्न केला पण काहीच उपयोग झाला नाही. मागच्या काही दिवसांपासुन सचिनला ऐंशीतील आजी त्याचा कॉलनीतील एका बंद घराच्या ओट्यावर दिसत होती. कदाचित ती घरापासुन वंचित होती. ऐन हिवाळ्याचा गोठावणार्या दिवसांत तिच्याकडे अंगावरच्या वस्त्रांशिवाय काहीही नव्हते. सचिनला आपल्या घरातील एक जुनी वापरात नसलेली गोधडी तिला देण्याची जीवापाड इच्छा झाली पण त्याने ठरविले होते की, आता आपणही कोणाला मदत करायची नाही. काही दिवसांनी त्यास कळाले की, त्या आजींचा एका रात्री जीवघेण्या थंडीमुळे मृत्यु झाला आहे. सचिन त्या गोष्टीने अतिशय खचला होता. त्याची आता लहानसहान गोष्टींवरही चिडचीड होऊ लागली होती.

त्याचे असे वागणे त्याचा आईला डोळ्यांत खुपु लागले होते. रोज या ना त्या विषयावर आईशी चर्चा करणारा सचिन आता तिच्याशी जास्त बोलतच नसे. तिच्याशी काय ताई आणि बाबांशीही बोलणे त्याचे बरेच कमी झाले होते. शेवटी न राहावुन आईने त्याला विचारलेच...

“बाळा, काय झालेय तुला? आजकाल जास्त बोलतही नाहीस; तुझ्या नवीन नवीन कल्पनाही सांगत नाहीस मला. तुझे सर्व कार्यक्रमही बंद केलेस तु आणि कुठे जातही नाहीस.”

“मग काय करु आई, कशाला मदत करु कुणाला? ज्या लोकांना फक्त घ्यायचे माहीत आहे त्यांना का मदत करु मी? एवढ्या चाळीस लोकांमधुन जर मी एकटाच त्या आजींना मदत करण्यास पुढाकार घेऊ शकतो तर मला उचलुन हॉस्पिटलमध्ये कुणीही का पुढाकार घेऊ शकत नाही आई? सर्वजण फक्त पाहायचे काम करतात आई. कोणी फोटो काढतं, कोणी शुटींग करतं तर कोणी एका जखमीवस्थेत बोलता न येणार्या व्यक्तीला त्याचा घराचा फोन नंबर विचारतं. त्या 40-50 लोकांचा गर्दीतुन एकही मला वाचवायला पुढे आला नाही. मी का करु अश्या लोकांचा समाजाला मदत? बाबांचा म्हणायचा अर्थ नेमका आता कळाला मला की ह्या जगाला आपली गरज नाहीये, सर्वजण आपापली जिंदगी जगण्यात मश्गुल आहेत. मीही आता फक्त माझे जीवन जगेन आणि फक्त स्वत:चाच विचार करेन, नाही करायची मला समाजसेवा आई!”

आई शांतपणे सर्व ऐकुन घेत होती. सचिनने एवढ्या दिवसांपासुन मनात दाबुन ठेवलेली गोष्ट आईसमोर आक्रमकरीत्या मांडली.

“बाळा, मी तुला आधीच बोलली होती की, हे कार्य अगदी निस्वार्थपणे करायचे असते मग तु समोरच्यांकडुन अपेक्षा केलीच कशी? जेव्हा कधीही अश्या समाजकार्यात काही स्वार्थ येतो तेव्हा ते कार्य ‘समाजसेवा’ नाहीतर ‘स्वयंसेवा’ असते. जे महान समाजसेवक होऊन गेले आहेत त्यांनीही त्यांच्याविरुद्ध होणार्या अनेक गोष्टी पचवल्या आहेत. अनेकांना तर, त्यांनी ज्या समाजासाठी दिवसरात्र कार्य केले त्याच समाजाने बहिष्कृतही केले होते पण त्यांनी न खचता आपले कार्य चालु ठेवले. एक गोष्ट लक्षात ठेव बाळा, समाजाला बदलणे खुप कठीण आहे पण स्वत:ला बदलणे अतिशय सोप्पे,” आईचे बोलणे सचिनला पटत होते, आईच्या शब्दांनी त्याला विचार करायला भाग पाडले होते.

“...आणि तु असा का विचार करतोस की, जसे तु त्या आजींसाठी केले होते तसे कोणीही एवढ्या लोकांमधुन तुला वाचवायला पुढे आले नाही म्हणुन तुही आतापासुन कोणाला मदत करणार नाहीस, त्याऐवजी तु असा विचार करना की, खरंच ह्या समाजाला माझ्यासारख्या आणखी काही लोकांची गरज आहे जे गरजुंना मदत करण्यासाठी नेहमी पुढाकार घेतील. जेव्हा असे लोकं समाजात निर्माण होतील, तेव्हाच तुला खर्या अर्थाने जीवन जगल्यासारखे वाटेल आणि समाधानही मिळेल.”

आईच्या बोलण्याने सचिनचे डोळे उघडले. त्याला त्याचा वागण्याचा पछतावा होत होता. जर त्याने आधीच असा काही पॉझिटीव्ह विचार केला असता तर कदाचित थंडीत कुडकुडणार्या मरण पावलेल्या त्या आजीचा जीव त्याने वाचवला असता. ह्या विचाराने त्याचे हृद्‌य भरुन आले, त्याने आईला घट्ट मिठी मारली व ‘थँक यु’ म्हटले.

सचिनने लागलीच गणेशला फोन लावला.

“हॅलो, गण्या!”

“बोल सच्या,”

“लवकर ये! आपल्या गँगला घेऊन, आपल्याला घरोघर जायचय.”

“का रे?”

“जुन्या गोधड्या व थंडीचे कपडे गोळा करायला!”

हे ऐकताच गणेशचा चेहर्यावर अस्सिम आनंद झळकला.

“ओके, आलोच!” म्हणत त्याने कॉल कट केला.

सचिनला आपले नवे आयुष्य निस्वार्थपणे जगण्याचा नवा मंत्र मिळाला होता.

तो लागला होता....एक नवा जागृत समाज निर्माण करायच्या तयारीला...

समाजसेवेचा किडा त्याचा डोक्यात पुन्हा वळवळला होता....